


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३०१, मंगळवार २० ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# हजारो भगिनींकडून खा. लंके यांना रक्षाबंधनाचे साकडे!

## राळेगणसिद्धीतही सलग सहाव्या वर्षी सामूहिक रक्षाबंधन



**पारनेर : प्रतिनिधी**

**नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील हजारो भगिनींनी सोमवारी खासदार नीलेश लंके यांना राख्या बांधून रक्षाबंधनाचे साकडे घातले. दरम्यान, राळेगणसिद्धी येथे सलग सहाव्या वर्षी खासदार नीलेश लंके, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या उपस्थितीत सामूहिक रक्षाबंधन साजरी करण्यात आले.**

तिसऱ्या सोमवारची औचित्य साधून हंगे येथे श्री हंगेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांनी सकाळपासून मोठी गर्दी केली होती. सकाळी दर्शनासाठी आलेल्या भगिनींनी खा. लंके यांच्या घरी जात त्यांना राख्या बांधल्या. त्यानंतर सोबलवाडी येथे झालेल्या मंदिराच्या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित महिलांनीही खासदार लंके यांना राख्या बांधून शुभेच्छा दिल्या.

राळेगण सिद्धी येथे रक्षाबंधनाच्या निमित्त विविध विकास कामांचे भूमिपूजन तसेच लोकार्पणाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, सरपंच जयसिंग मापारी, दत्ता आवारी, सचिन पठारे, कारभारी पोटघन, संदीप शिंदे, सुभाष पठारे, किसन मापारी, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

श्री. भैरवनाथ मंदिरात सामूहिक रक्षाबंधनाचे आयोजन करण्यात आले होते. खासदार नीलेश लंके हे आमदार म्हणून विधानसभेत जाण्यापुर्वीपासून राळेगणसिद्धी येथील रक्षाबंधनास उपस्थित राहतात. यंदाही या कार्यक्रमास उपस्थित राहून त्यांनी भगिनींशी संवाद साधला. उपस्थित महिलांनी खा. लंके यांना राख्या बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा केला.

यावेळी बोलताना खासदार लंके म्हणाले की मतदारसंघातील माझ्या सर्व भगिनींचे रक्षण करणे हे भाऊ म्हणून माझे कर्तव्य आहे. सहा वर्षापासून मी दरवर्षी राळेगणसिद्धी येथील रक्षाबंधनास हजेरी लावतो. भगिनींनी प्रेमाने राखी बांधल्यानंतर मिळालेली ऊर्जा वर्षभर पुरते. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे हे आमचे मार्गदर्शक आहेत. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली मतदार संघाचा विकास करण्याचे आपले धोरण आहे. त्यांच्याच साडेचार वर्ष विधानसभेत आमदार म्हणून काम करताना हजारे यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेऊन आपण मतदार संघात ठसा उमटविल्याचे खा. लंके म्हणाले.

# राज्य सरकारकडून सरकारी खर्चाने राजकीय प्रचार

## ■ आ.बाळासाहेब थोरातांचा हल्लाबोल ■ लाडक्या बहिणींचे राजकारण करत असल्याचा आरोप

**संगमनेर : प्रतिनिधी**



**रक्षाबंधन हा प्रेमाचा संदेश देणारा सण संपूर्ण देशामध्ये आनंदाने साजरा होत आहे. बहिण भावाच्या निस्वार्थी प्रेमाचा हा सण जगाला आदर्शवत आहे. मात्र सध्या या नात्याचे होत असलेले राजकारण आणि सरकारी खर्चाने होत असलेला राजकीय प्रचार हा अत्यंत दुर्दैवी असल्याची टीकाही राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात यांनी राज्य सरकारवर केली आहे. भाऊ बहिणीच्या पवित्र नात्याचे राजकारण होणे दुर्दैवी आहे. हा निस्वार्थी प्रेमाचा संदेश देणारा जगाला आदर्शवत असा सण असल्याचे थोरात यांनी म्हटले आहे.**

सध्या राज्य सरकारकडून शासकीय खर्चामध्ये राजकीय प्रचार केला जात आहे. विविध कार्यक्रमांना शासकीय कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा सेविका यांना उपस्थित राहण्यासाठी सक्ती केली जात आहे. यातून महिलांचे व स्थानिक नागरिकांचे हाल होत आहे. मागील पाच वर्षात महाराष्ट्रात झालेले राजकारण हे कसे नसावे याचे उदाहरण आहे. पातळी सोडून राजकारण होत आहे. विरोध विचारांचा असावा पण व्यक्तिगत नसावा. जिव्हाळ्याची माणसे विरोध करत आहेत. हे दुर्दैवी आहे. असे घडू नये, असेही थोरात यांनी म्हटले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राज्य सरकारने राजकारणासाठी पुढे लांबविल्या आहेत. आता विधानसभेच्या निवडणुका ही पुढे ढकललेल्या आहेत. खरे तर निवडणूक आयोग ही स्वायत्त संस्था आहे. मात्र सध्या सत्ताधाऱ्यांच्या मर्जीने होत असलेले निर्णय हे देशाच्या आणि उर्वरीत पान ३ वर

# राज्यातील विधानसभा निवडणूक डिसेंबरमध्ये होणार ?

## ■ लाडक्या बहिणीसाठी निवडणूक पुढे ढकलल्याची चर्चा ■ राष्ट्रपती राजवट लागू होण्याची शक्यता

**मुंबई : प्रतिनिधी**




**राज्यात नोव्हेंबर महिन्यात विधानसभा निवडणुका होणार असल्याची बातमी आधी समोर आली होती. पण आता विधानसभा निवडणुका नोव्हेंबरमध्ये न होता डिंसेंबरपर्यंत लांबणीवर पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. एका वृत्तवाहिनीने यासंदर्भात वृत्त प्रसिद्ध केले आहे.**

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीला मोठा फटका बसला होता. त्यानंतर सत्ताधारी महायुती सरकारकडून मुख्यमंत्री लाडकी बहीणसह अनेक योजनांची घोषणा कऱण्यात आली. ही योजना तातडीने राबवण्याची प्रक्रियाही सुरू करण्यात आली. यावरून अनेक आरोप प्रत्यारोप होऊ लागले. त्यामुळे या योजना कधी रावबणार उर्वरीत पान ३ वर

# रोहितदादांच्या मतदारसंघात जय पवारांची फिल्डींग!

## कर्जत-जामखेड मतदारसंघात बैठका | कार्यकर्त्यांच्या भेटीगाठीने चर्चेला उधाण

**कर्जत : प्रतिनिधी**

**उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवारांनी दोनच दिवसांपूर्वी बारामती मतदारसंघाबद्दल महत्त्वाचे संकेत दिले. बारामतीमधून जय पवारांना संधी देणार का, या प्रश्नाला अजित पवारांनी सकारात्मक उत्तर दिले. त्यामुळे अजित पवार बारामती सोडतील अशा चर्चांना उधाण आले. बारामती सोडणारे अजित पवार कुठून लढणार याची चर्चा सुरु झाली. अजित पवारांचा लेक जय पवार आज आमदार रोहित पवारांच्या मतदारसंघात पोहोचले आहेत.**



त्यांनी कर्जत-जामखेडमध्ये बैठका घेण्यास सुरुवात केली आहे.

जय पवारांच्या कर्जत-जामखेड दौऱ्याला आजपासून सुरुवात झालेली आहे. पक्षफुटीनंतर शरद पवारांसोबत राहिलेल्या रोहित पवारांना धक्का देण्यासाठी अजित पवार गटाने त्यांच्या मतदारसंघात फिल्डिंग लावण्यास सुरुवात केली आहे. त्याच व्यूहनीतीचा भाग म्हणून जय पवार कर्जत-जामखेडच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी भेटीगाठी, बैठकांच्या माध्यमातून मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. कर्जत-जामखेडमध्ये अजित पवार गट रोहित पवारांविरोधात तगडा उमेदवार देण्याच्या तयारीत आहे.

अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार २०१९ मध्ये, तर अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार २०२४ मध्ये लोकसभा लढल्या. पण निवडणुकीच्या राजकारणात दादांच्या पत्नी, लेकाची डाळ शिजली नाही. त्यानंतर आता दादांच्या कुटुंबातील आणखी एक सदस्य निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. जय पवारांना बारामतीमधून संधी देण्याबद्दल अजित पवारांनी सकारात्मक उत्तर दिल्याने चर्चांना उधाण आले आहे. जय पवार यांना संधी द्यायला हवी किंवा नाही, हे आमच्या उर्वरीत पान ३ वर




# निवडणुका कितीही पुढे ढकलल्या तरी निकाल बदलणार नाही

## ■ हा सरकारचा रडीचा डाव ■ खासदार सुप्रिया सुळे यांचा आरोप

**मुंबई : प्रतिनिधी**

**केंद्रीय निवडणूक आयोगाच्या वतीने हरियाणातील निवडणुका जाहीर झाल्या असल्या तरी अद्याप महाराष्ट्रातील निवडणुका जाहीर झालेल्या नाहीत. त्यामुळे महाराष्ट्रातील निवडणुका पुढे ढकलल्या जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यातच आता थेट राष्ट्रपती राजवट लागू करत डिसेंबरमध्ये निवडणुका होण्याची शक्यता वर्तवली जात असतानाच यावर सुप्रिया सुळे यांनी टीका केली आहे. निवडणुका कितीही पुढे ढकलल्या तरी निकाल बदलणार नाही. हा सरकारचा रडीचा डाव असल्याचा आरोप खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे.**



लाडकी बहीण योजने शिवाय हे पास होत नसतील तर यातच या सरकारचे अपयश दिसून येते. पैसे उर्वरीत पान ३ वर










# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या




## लॅपटॉप मांडीवर ठेवून वापरता?

**आजकाल बहुतेक लोक लॅपटॉपवर काम करू लागले आहेत. घरूनच काम केले तर लॅपटॉप लोकांच्या मांडीवरच मिळतात. तथापि, लॅपटॉप आपल्या मांडीवर घेऊन काम करणे खूप धोकादायक ठरू शकते. यामुळे तुम्हाला आजारही होऊ शकतो. अशा परिस्थितीत आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. या लेखात आम्ही तुम्हाला लॅपटॉप मांडीवर ठेवल्याने चालविण्याचे काय तोटे आहेत ते सांगणार आहोत...**


- लॅपटॉपमधून इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशन निघतात : लॅपटॉप वापरताना त्यातून इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशन बाहेर पडतात. तथापि, लॅपटॉपमधून उत्सर्जित होणारे रेडिएशन वाय-फाय आणि ब्लूटूथपेक्षा कमी आहे. पण जेव्हा तुम्ही ते तुमच्या मांडीवर ठेवता तेव्हा हे रेडिएशन शरीराच्या थेट संपर्कात येते. यामुळे तुमच्या आरोग्याला हानी पोहोचू शकते.
- लॅपटॉप मांडीवर ठेवण्याचे हानिकारक परिणाम : जर तुम्ही तुमच्या मांडीवर लॅपटॉप घेऊन जास्त वेळ काम करत असाल तर त्यामुळे तुमच्या मणक्याला त्रास होऊ शकतो. याचा मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो. काही अहवाल असे सूचित करतात की यामुळे टोस्टेड स्किन सिंड्रोम देखील होऊ शकतो. याशिवाय शरीराची मुद्राही बिघडते.

### या ६ गोष्टी लक्षात ठेवा...

- तुम्ही तुमचा लॅपटॉप नेहमी अपडेट ठेवला पाहिजे. लॅपटॉपचे सर्व प्रोग्राम्स, ऑपरेटिंग सिस्टीम आणि व्हायरस सुरक्षा सॉफ्टवेअर अपडेट ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.
- लॅपटॉप वापरताना वायरलेस माऊस आणि कीबोर्डचा वापर केल्यास लॅपटॉप वापरणे खूप सोपे होईल.
- लॅपटॉप खूप पोर्टेबल असतात. त्यामुळे लॅपटॉपची स्क्रीन तुम्हाला हवी तितकी मोठी आहे याची खात्री करून घ्यावी लागेल. यामुळे तुम्हाला स्क्रीनवर मजकूर आणि वस्तू पाहण्यासाठी जास्त ताण सहन करावा लागणार नाही. तसेच मजकूरही सहज वाचता येईल.



- लॅपटॉप नेहमी सपाट पृष्ठभागावर वापरावा. बहुतेक लॅपटॉपमध्ये बाजूंच्या किंवा तळाशी एअर व्हेंट्स असतात. तुम्ही तुमचा लॅपटॉप उशी किंवा पलंग सारख्या असमान पृष्ठभागावर जास्त काळ ठेवल्यास, तो जास्त गरम होतो. अशा स्थितीत लॅपटॉप नेहमी सपाट जागेवर ठेवावा.
- लॅपटॉपचे व्हेंट नेहमी स्वच्छ ठेवावेत. त्यामध्ये धूळ साचते आणि ते अडकते. यामुळे लॅपटॉप गरम होतो. कारण गरम हवा बाहेर जाऊ शकत नाही. अशा परिस्थितीत, वेळोवेळी ते स्वच्छ करणे खूप महत्वाचे आहे.
- कूलिंग पॅड वापरणे हा देखील एक चांगला पर्याय असू शकतो. तुम्ही तुमच्या लॅपटॉपसाठी कूलिंग पॅड देखील वापरू शकता. हे केवळ तुमचा लॅपटॉप चांगल्या स्थितीत ठेवणार नाही, तर तुमच्या लॅपटॉपचा तळही थंड करेल.




## सेफनेट उद्देश साध्य करण्यासाठी...

**इंटरनेट हाताळताना आपल्या मुलांवर वॉच ठेवण्यासाठी सेफनेट हे ॲप येणार आहे. मात्र, हे ॲप फायदेशीर ठरण्याऐवजी त्याच्या वापरावरच अनेक प्रश्नचिन्हे निर्माण झाले आहेत.**

मुलांचा वाढता स्क्रिन टाइम हा सर्वच पालकांसाठी चिंतेचा विषय ठरला आहे. प्रामुख्याने ऑनलाइन शिक्षणावर भर दिला जात असल्याने पालकांना मुलांसाठी इंटरनेटची सुविधा उपलब्ध करून द्यावी लागत आहे. अशा स्थितीत काहीवेळा इंटरनेटचा दुरुपयोग होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. परिणामी त्यांच्या ऑनलाइन घडामोडींवर देखरेख करण्यासाठी ॲप किंवा संकेतस्थळ आणण्याचे प्रयत्न होत असले तरी इंटरनेटच्या मायाजालमधून त्यांना कितपत वाचवता येईल, हा प्रश्न आहेच. अर्थात त्यादृष्टीने टाकण्यात येणारे पाऊल हे कौतुकास्पद आहे. अलीकडच्या एका अहवालानुसार, भारतात इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय सध्या 'सेफनेट' ॲपवर काम करत असून तो ॲप पालक आणि पाल्य यांच्या फोनमध्ये कनेक्टिव्हिटी ठेवण्याचे काम करणार आहे. याप्रमाणे मुलांच्या ऑनलाइन ॲक्टिव्हिटी पालकांपर्यंत पोहोचू शकतील. अशा प्रकारचे देखरेख करणारे ॲप किंवा संकेतस्थळ सुरू करण्याची परवानगी दिल्यानंतर मुले कितीकाळ ऑनलाइन राहतात, हे तपासण्याची व्यवस्था असेल. त्याचवेळी सेफनेट हे यूट्यूबसारख्या साइटवर दाखविण्यात येणाऱ्या सामग्रीची माहिती देण्याबरोबरच कॉल डिटेल्स आणि मेसेजदेखील शेअर करेल, असे म्हटले जात आहे. 'इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हायडर असोसिएशन ऑफ इंडिया' यांनी मात्र हे ॲप सर्व ग्राहकांच्या फोनमध्ये डिफॉल्ट रूपात असायला हवे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. मुलांची ऑनलाइन सुरक्षा हा कळीचा मुद्दा आहे आणि इंटरनेटच्या अतिवापरामुळे मुलांवर होणाऱ्या दुष्परिणामाबाबत चर्चा होणे स्वाभाविक आहे. अर्थात मुलं इंटरनेटचा वापर कसा करतात, कशासाठी करतात आणि का करतात, यानुसार त्यांच्या प्रभावाचे आकलन करायला हवे. मात्र धोरणकर्त्यांच्या मते, प्रत्यक्षात दैनंदिन जीवनाप्रमाणेच आभासी जगातही लक्ष ठेवण्याचे पालकांनी कर्तव्य बजावले पाहिजे.

### या बाबींचा विचार हवाच!

- पहिली म्हणजे वास्तविक जगातही पालक मुलांपर्यंत पोचणाऱ्या सर्व माहितींवर नियंत्रण ठेवू शकत नाहीत. एखादी गोष्ट किंवा घटना मुलांना कशी कळाली, हे ऐकून काहीवेळा पालकांनाच आश्चर्याचा धक्का बसतो. कारण मुलांच्या मित्रांत सुरू असलेल्या चर्चेपासून पालकमंडळी अनभिज्ञ असतात. अशा स्थितीत ऑनलाइन जगात पालकांनी मुलांच्या सक्रियतेला लगाम घातला तर संघर्षाची ठिणगी पडण्याची शक्यता अधिक राहू शकते. बालमानसोपचार तज्ज्ञांच्या मते, पालकांचे लक्ष आणि मुलांची स्वायत्तता यांच्यात पुसटशी रेषा असून ती ओळखणे गरजेचे आहे.
- दुसरा मुद्दा म्हणजे, खासगीपणा, गोपनीयतेवर हल्ला करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या उपकरणांचा दुरुपयोग होण्याची शक्यता अधिक असते. विशेषतः आपल्याच कुटुंबात सापत्न व्यवहाराचा सामना करणाऱ्या मुलांसाठी ही बाब चिंताजनक आहे. याशिवाय 'राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५' नुसार भारतात एकतृतीयांश महिला आपल्या जोडीदाराकडून कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडतात. अशावेळी पत्नीवर नियंत्रण ठेवण्यासाठी बरीच मंडळी या उपकरणांचा वापर करू शकतात. एवढेच नाही तर या माध्यमातून मुलांच्या तुलनेत मुलींच्या दैनंदिन जीवनावर देखील नियंत्रण मिळवले जाऊ शकते.



- 'यंग लीडर्स फॉर ॲक्टिव्ह सिटीझनशिप'च्या एका सर्वेक्षणानुसार ८० टक्के पालक हे इंटरनेटवर अधिक वेळ घालवत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच इंटरनेटवर काही अडल्यास तेच मुलांची मदत घेत असल्याचे निदर्शनास आले आहे. आजकाल पालक स्वतःच 'रील'मध्ये आकंठ बुडालेले असतात, तर मग मुलांवर लक्ष कोण ठेवणार?

### मुले पुढाकार घेतील असे काहीतरी करणे गरजेचे...

मुलांची ऑनलाइन सुरक्षा सुनिश्चित करताना अनेक समस्यांचा जन्म होऊ शकतो. त्यामुळे सर्वंकष विचार करणे आवश्यक आहे. यासाठी आपल्याला सर्वात अगोदर कायद्यात सुधारणा करावी लागेल. उदाहरणार्थ, आयटी अधिनियम २००० ची जागा घेणाऱ्या नव्या भारतीय कायद्यात ब्रिटनच्या एज अप्रोपिएटड डिझाइन कोड (ज्याला आपण मुलांची संहिता म्हणतो) आणि 'द ओटिरोवा न्यूझीलंड कोड ऑफ प्रॅक्टिस फॉर ऑनलाइन सेफ्टी अँड हार्म्स' या सारख्या नियमांची तरतूद हवी. दुसरे म्हणजे पूर्वीपासूनच उपलब्ध असलेल्या नियंत्रण उपकरणांना अधिक सक्षम करण्यासाठी ऑनलाइन घडामोडी, व्यवहार निश्चित करावे लागतील. तिसरे म्हणजे आपण शिक्षण संस्थांना देखील या घडामोडीत सामील करून घेणे गरजेचे आहे. प्रत्यक्षात पालक हे मुलांच्या 'स्क्रिन टाइम'वरून चिंतित असतात आणि यासंदर्भात धोरण आखताना पुनर्विचार करणे गरजेचे आहे. अर्थात, सध्याच्या काळात मुलांचा स्क्रिन टाइम लक्षणीय वाढला आहे. चौथी गोष्ट म्हणजे, कोणताही मार्ग किंवा सल्ला हे मुलं मोकळ्या मनानं स्वीकारणार नाहीत, याची जाणीव सर्व शिक्षक आणि पालकांना असते. कारण मुले इंटरनेट वापराबाबत अधिक कुशल असतात आणि ते रचनात्मक पातळीवर वापर करत असतात. म्हणून मुलांनी स्वतःच सायबर किंवा ऑनलाइन सुरक्षेबाबत पुढाकार घ्यावा, या दृष्टीने प्रयत्न करायला हवेत.


## मोबाईलवरून डिलीट झालेले संपर्क क्रमांक कसे परत आणायचे?

**तुम्हाला माहिती आहे का, तुमच्या मोबाईलमध्ये सेव्ह केलेले कॉन्टॅक्ट थेट क्लाउडवर स्टोअर केले जातात. वास्तविक Google One सेवा Google द्वारे ऑफर केली जाते. पण जीमेल वापरकर्त्यांना १५ जीबी फ्री क्लाउड स्टोरेज दिले जाते. तुमच्या अँड्रॉइड स्मार्टफोनचे कॉन्टॅक्ट्स इथे सेव्ह केले जातात.**

तुमच्या मोबाईल क्रमांकावरून संपर्क क्रमांक गायब झाल्यास कोणीही काळजी करू शकते. वास्तविक, अशी अनेक प्रकरणे पहायला मिळत आहेत जिथे कॉन्टॅक्ट लिस्टमध्ये सेव्ह केलेले नंबर गायब होत आहेत.

### गहाळ संपर्क परत कसे मिळवायचे...

आम्ही तुम्हाला सांगतो की जर एखाद्याने तुमच्या Gmail वरून कॉन्टॅक्ट डिलीट केला असेल तर तो थेट डिलीट होत नाही. या सर्व संपर्क सूची रिसायकलिंग बिनमध्ये आहेत, जिथून ते पुनर्प्राप्त केले जाऊ शकते.



वास्तविक हे गुगलच्या मालकीच्या जीमेलमुळे होत आहे. अलीकडे, अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत ज्यात हॅकर्स आपल्या जीमेलचा ॲक्सेस घेतात. यानंतर, तुमच्या जीमेलमध्ये सेव्ह केलेले कॉन्टॅक्ट डिलीट केले जातात, ज्यामुळे तुमच्या फोनमधून मोबाईल नंबर गायब होतात. वास्तविक तुमची संपर्क यादी तुमच्या जीमेल खात्याशी जोडलेली असते.




याच कारणामुळे तुम्ही तुमचे जीमेल खाते इतर कोणत्याही मोबाइलमध्ये लॉग इन करताच तुमचे सर्व संपर्क आणि Google ड्राइव्हमध्ये सेव्ह केलेले फोटो, व्हिडिओ आणि कागदपत्रे त्या मोबाइलवर पोहोचतात. अशा परिस्थितीत पहिली अट म्हणजे तुमच्या जीमेलची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे सर्वप्रथम तुम्ही जीमेलमध्ये टू फॅक्टर ऑथेंटिकेशन चालू केले पाहिजे. तसेच पासवर्ड वेळोवेळी बदलला पाहिजे.

## नेटफ्लिक्सचा पुन्हा धक्का! जूनपासून हे फीचर होतेय बंद, मासिक खर्च वाढणार

**नेटफ्लिक्सवरील एक महत्त्वाचे वैशिष्ट्य (फिचर) बंद केले जात आहे. ज्यामुळे तुमचा दैनंदिन डेटा खर्च वाढू शकतो. त्यामुळे तुमच्या मासिक खर्चातही वाढ होईल. याविषयी सविस्तर जाणून घेऊया...**

यापूर्वी, नेटफ्लिक्सने पासवर्ड शेअरिंग फीचर बंद केले होते. ज्यामुळे वापरकर्त्यांना त्यांचे नेटफ्लिक्स सबस्क्रिप्शन घेणे भाग पडले होते. अशा परिस्थितीत अनेक नेटफ्लिक्स युजर्सचा त्रास वाढला होता. आता Netflix ऑफलाइन व्हिडिओ डाउनलोड फीचर बंद करत आहे.

- काय नुकसान होईल? : हे फीचर बंद झाल्यानंतर युजर्सच्या मोबाईल डेटाचा वापर वाढणार आहे. आतापर्यंत वाय-फाय रेंज असताना वापरकर्ते नेटफ्लिक्स ॲपमध्ये चित्रपट आणि शो डाऊनलोड करायचे आणि वाय-फाय नसताना इंटरनेटशिवाय चित्रपट आणि शो पाहायचे. पण आता नेटफ्लिक्स तुम्हाला वाय-फाय रेंजच्या बाहेर असताना मोबाइल डेटा वापरावा लागेल. अशा परिस्थितीत डेटा खर्च वाढेल.
- कोणते वापरकर्ते प्रभावित होतील? : अहवालानुसार, नेटफ्लिक्स विंडोज १० आणि विंडोज ११ वापरकर्त्यांना व्हिडीओ डाउनलोड करण्याची परवानगी देणार नाही. पूर्वी १०८० पिक्सेल म्हणजेच फुल एचडी व्हिडिओ डाऊनलोड करू शकत होते. तथापि, वापरकर्ते मोबाइल आणि टॅबलेट डिव्हाइसवर टीव्ही शो आणि चित्रपट ऑफलाइन पाहू शकतील.
- जाहिराती लवकरच दिसतील : नेटफ्लिक्स ॲपच्या नवीन अपडेटनंतर वापरकर्ते स्वस्त रिचार्जवर जाहिरातींसह चित्रपट आणि शो पाहू शकतील. या योजनेत व्यावसायिक ब्रेक असतील. सध्या भारतात कोणतीही जाहिरात समर्थित सामग्री उपलब्ध नाही.



## ५ स्टार की 3 स्टार?

### घरासाठी एसी घेताना या गोष्टी लक्षात ठेवा...

**विंडो एसी किंवा स्प्लिट एसी खरेदी करताना तुम्हाला सर्वात मोठी समस्या भेडसावत असते की कोणता एसी घ्यायचा? आज आम्ही तुम्हाला ३ स्टार आणि ५ स्टार एसीमधील फरक समजावून सांगणार आहोत. यानंतर तुम्हाला समजेल की वीज किती वाचवता येते.**

पावसाळा तोंडावर आला तरी ऊन कमी घेण्याचे नाव घेत नाहीये. वाढत्या उकाड्यामुळे अनेक जण एसी घेण्याचा विचार अजूनही करत आहेत. तुम्हीही एसी घेण्याचा विचार करत असाल तर आम्ही तुम्हाला काही गोष्टी सांगणार आहोत. ३ स्टार आणि ५ स्टार असे दोन प्रकारचे एसी सध्या बाजारात उपलब्ध आहेत. नवीन एसी घेण्यापूर्वी या दोन्हींमधील फरक देखील जाणून घ्या. डायकिन कंपनीने आपल्या वेबसाइटवर दोन एसीमधील फरक स्पष्ट केला आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, जर एखाद्या ग्राहकाने ३ स्टार एसीच्या तुलनेत ५ स्टार एसी खरेदी केला तर विजेची मोठी बचत होणार आहे. याशिवाय ५ स्टार एसी सुद्धा जास्त कूलिंग देतो असे कंपनीचे म्हणणे आहे. यामुळे तुम्हाला दोन्ही एसींमध्ये कोणतीही अडचण येणार नाही. पण एका निर्णयाने सर्व काम सोपेही होऊ शकते.

### किती वीज वाचवते?

डायकिनच्या मते, ३ स्टारच्या तुलनेत ५ स्टार २८ टक्के विजेची बचत करते. कंपनीने यासंबंधीचा डेटा देखील शेअर केला आहे जो दर्शवितो की दोन्ही AC च्या पॉवर सेव्हिंग क्षमतेमध्ये किती फरक आहे. याचा अर्थ असा की जर तुम्ही ५ स्टार एसी घेतला तर तुम्हाला थोडे जास्त पैसे द्यावे लागतील, पण त्यानुसार विजेचीही बचत होते. ३ स्टार एसीच्या तुलनेत, ५ स्टार एसी १९३ वॅट्स कमी वीज वापरतो. ३ स्टार एसी ७४७ वॅट पॉवर वापरतो तर ५ स्टार एसी ५५४ वॅट पॉवर वापरतो. याचा अर्थ कमी वीज वापर असूनही तुम्हाला उत्कृष्ट कूलिंग मिळते. अशा परिस्थितीत ५ स्टार एसी खरेदी करणे तुमच्यासाठी अधिक फायदेशीर ठरू शकते. दोन्ही एसीच्या किमतीत ५ ते १० हजार रुपयांची तफावत आहे.



## शॉर्ट न्यूज

### धर्मांधांचे २ हिंदूंवर प्राणघातक आक्रमण

■ **श्रीरामपूर :** पशुवधगृहाकडे गायी घेऊन जाणारे वाहन पोलिसांनी येथे पकडले. ते वाहन घटनास्थळावरून पोलीस ठाण्यापर्यंत आणण्यास पोलिसांना साहाय्य केल्याने धर्मांधांच्या गटाने निर्मळ आणि मापारी नावाच्या २ हिंदूंवर प्राणघातक आक्रमण केल्याची घटना श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या आवारामध्ये घडली. हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या कार्यकर्त्यांनी पोलीस ठाण्यामध्ये गर्दी केली. पोलिसांनी धर्मांधांच्या गटातील २ जणांना अटक केली असून इतर आरोपींचा शोध चालू आहे. या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात धर्मांधांविरोधात तक्रार प्रविष्ट केली आहे.

### तंटामुक्ती समिती अध्यक्षपदी आरगडे

■ **सौंदाळा :** ग्रामपंचायतच्या तंटामुक्त समिती अध्यक्षपदी माजी सरपंच वैशाली दिगंबर आरगडे यांची निवड झाली आहे. सरपंच शरदराव आरगडे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेत उपसरपंच गणेश अरुण आरगडे यांनी अध्यक्षपदाकरिता वैशाली आरगडे यांच्या नावाची सूचना मांडली त्यास अनुमोदन बाबासाहेब रावसाहेब आरगडे यांनी दिले. यापूर्वी कॉम्रेड बाबा आरगडे यांच्या अध्यक्षतेखाली गावाला तंटामुक्तीचे बक्षीस मिळालेले आहे. तीच परंपरा कायम ठेवून गावाचे नाव वाढवणार असल्याची प्रतिक्रिया वैशाली आरगडे यांनी दिली.

### साखर कामगार संघटनेकडून घुलेंचा सत्कार

■ **नेवासा :** तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, जिल्हा सहकारी बँकेचे संचालक चंद्रशेखर घुले पाटील यांचा साखर कामगार संघटनेच्या वतीने राज्य साखर कामगार फेडरेशनचे सरचिटणीस नितीन पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. साखर कामगार संघटनेचे अध्यक्ष अशोकराव मिसाळ, उपाध्यक्ष सुखदेव फुलारी, संजय राऊत, सचिव संभाजीराव माळवदे, सदस्य अण्णासाहेब गर्जे, राजेंद्र शिंदे, अल्ताफ पटेल, अंबादास गोंडे, सुनील जपे, शोयब शेख, सोमनाथ ओहळ, संजय कावरे आदी यावेळी उपस्थित होते.

### पावसाने दडी मारल्याने खरीप पिके धोक्यात

■ **संगमनेर :** तालुक्यात पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील बाजरी, सोयाबीन, मका, भुईमूग यासह अन्य पिके धोक्यात आले आहेत. संगमनेर तालुक्यात सर्वत्र खरीप हंगामातील पिके जोमात आहेत. मात्र पिकांना पाण्याची नितांत आवश्यकता असतानाच पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे जोमात असलेली खरीप हंगामातील पिके कोमेजू लागले आहेत. सध्या उन्हाचा तडाका सुरू झाला असून शेतकरी पावसाची प्रतीक्षा करीत आहेत. पावसाअभावी खरीप पिकांना फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### लाडक्या बहिणींची बँकेत गर्दी

■ **शेवगाव :** राज्यातील महिलांना या लाडकी बहीण योजनेसाठी कंबर कसल्याचे दिसून येत आहे. कागदपत्रांसाठी त्यांची धावपळ उडाली आहे. सकाळी बँक उघडण्यापूर्वी महिलांची लांबच लांब रांग दिसून येत आहे. शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी येथील सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखेमध्ये लाडकी बहीण योजनेसाठी मोठी गर्दी उसळली होती सकाळी बँक उघडण्यापूर्वीच नंबर लावण्यासाठी बँकेसमोर रांग लागली होती, खाते उघडणे, केवायसी बँक, पासबुक यासाठी महिलांची गर्दी होत आहे.

# लाडक्या बहिणींनी व्यक्त केली सरकारप्रती कृतज्ञता

## मंत्री विखे पाटलांना राख्या बांधून आनंद साजरा

**लोणी : प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळालेल्या हजारो बहिणींनी महायुती सरकारच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. रक्षा बंधनाच्या पुर्वेसंध्येला योजना यशस्वीतेचा आनंद बहिणींनी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना राख्या बांधून व्यक्त केला.**



निमित्त होते भारतीय जनता पक्षाच्या वतीने संपूर्ण राज्यात आयोजित केलेल्या लाडक्या बहिणींशी संवादाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व बहिणींशी संवाद साधला. भारतीय जनता पक्षाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उत्तर नगर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील महीलांनी प्रवरानगर येथे डॉ.धनंजय गाडगीळ सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमास महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.शालीनीताई विखे पाटील, उत्तर नगर जिल्ह्याचे अध्यक्ष विठ्ठलराव लंघे, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, सरचिटणीस नितीन दिनकर, डॉ.विखे पाटील कारखान्याचे चेअरमन कैलास तांबे यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सर्व बहीणींच्या वतीने मंत्री विखे पाटील यांना सन्मानित करून महायुती सरकारप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

याप्रसंगी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, महायुती सरकार देणारे सरकार आहे. आजपर्यंत महायुती सरकारने सुरू केलेली एकही योजना बंद पडली नाही. लाडकी बहिण योजना पाच वर्ष सुरू राहाणारी आहे. यासाठी आर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली. या योजनेमुळे राज्यातील महीलांचा सन्मान अधिकच वाढला असल्याचे त्यांनी सांगितले.

महायुती सरकारच्या योजनेला विरोधक जाणीवपुर्वक विरोध करीत होते. त्यांना न्यायालयाने फटाकरले, त्यामुळे बहीणींसाठी सुरू केलेली योजना कधीही बंद पडणार नाही अशी ग्वाही देवून जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात आता योजनेच्या माहीतीसाठी आणि त्यातील त्रृटी दूर करण्यासाठी हेल्पलाईन नंबरची उपलब्धता करून देणार असल्याचे विखे पाटील यांनी जाहीर केले.

जिल्ह्यातील सर्व अंगवणवाडी सेविकांसह, ग्रामसेवक, आशा सेविका यांनी केलेल्या चांगल्या कामामुळे नऊ लाख महीलांना या योजनेचा लाभ मिळू शकला. त्यांचे अभिनंदन करून मंत्री विखे पाटील म्हणाले की, विद्यार्थीनींकरीता मोफत शिक्षण आणि जेष्ठ नागरीकांसाठी मुख्यमंत्री तिर्थ दर्शन योजना सुरू करून सर्व समाज घटकांना न्याय देण्याची भूमिका महायुती सरकारची असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोफत धान्य योजनेला दिलेली मुदतवाढ आणि राज्य सरकारच्या आनंदाचा शिधा योजनेमुळे सामान्य माणसाला मोठा आधार मिळाला असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले.

## (पान १ वरून) राज्य सरकारकडून सरकारी खर्चाने राजकीय प्रचार

लोकशाहीच्या हिताचे नाही अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. काही लोक काँग्रेस पक्ष सोडून गेले म्हणून पक्ष संपत नाही. पक्ष वाढतो आहे. नव्यांना संधी मिळत आहे. नांदेड मध्ये मोठमोठे नेते सोडून गेले. मात्र जनता काँग्रेस बरोबर आहे याचे उत्तम उदाहरण आहे. काँग्रेस हा देश हिताचा विचार व देश हिताचे तत्त्वज्ञान असल्याने जनतेचा कायम मोठा पाठिंबा असून सध्या राज्य सरकारकडून सरकारी खर्चाने होत असलेले प्रचार हा महाराष्ट्रातील जनतेला कधीही आवडणार नाही असे विधिमंडळातील ज्येष्ठ नेते आमदार बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे.

## राज्यातील विधानसभा निवडणूक डिसेंबरमध्ये होणार ?

आणि त्यांचा प्रचार कधी करणार, असे अनेक प्रश्न असल्याने राज्यातील विधानसभा निवडणुकाच डिसेंबर पर्यंत पुढे ढकलण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. नियमानुसार महाराष्ट्र विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संपत आहे. त्यामुळे त्याआधीच नवी विधानसभा अस्तित्वात येणे अपेक्षित हे. पण लाडकी बहीण योजनेमुळे निवडणूक लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, निवडणूक आयोगाने नुकतेच हरियाणा आणि जम्मू-कश्मीरच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला. हरियाणा आणि जम्मू-कश्मीरसह, महाराष्ट्र आणि झारखंड या रांज्याच्याही निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होईल अशी शक्यता होती. दिवाळीनंतर महाराष्ट्राच्या निवडणुका होतील, असा अंदाज होता. पण महाराष्ट्र आणि झारखंडच्या निवडणुका जाहीर न झाल्यामुळे महाराष्ट्रातील निवडणूक लांबणीवर पडणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली. त्यातच आता महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. लोकसभा निवडणुकीतील महायुतीला मोठा फटका बसला. निवडणुकीपूर्वी ४८ पैकी ४५ जागा आपल्याला मिळतीस असा विश्वास महायुतीने व्यक्त केला होता. पण महायुतीला केवळ १७ जागांवर समाधान मानावे लागले. त्यानंतर विधानसभा निवडणुकीतही महायुतीचा पराभव होणार, अशी चर्चा राज्यभरात रंगू लागल्या. विधानसभा निवडणुकीत असा पराभव होऊ नये, यासाठी महायुती सरकारने अनेक लोकप्रिय योजनांची घोषणा केल्या. यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा करण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून २१ ते ६५ वयोगटातील महिलांना राज्य सरकारकडून महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा करण्यात आली.
विशेष म्हणजे,१४ ऑगस्टपासून महिलांच्या खात्यात पहिल्या हप्त्याचे पैसेही जमा होऊ लागले. पण ही योजना राज्यभरातील जास्तीत जास्त महिलांसाठी पोहोचवण्यासाठी आणखी दोन-तीन महिन्यांच्या कालावधीची गरज आहे. पण त्याआधीच निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यास खोळंबा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकाच पुढे ढकलण्याचा घाट घातल्याचे बोलले जात आहे.

**तर राज्यात राष्ट्रपती राजवट लागू होणार**

२६ नोव्हेंबर २०२४ रोजी महाराष्ट्राच्या विधानसभेची मुदत संपत आहे. पण राज्यात राज्यात वेळेत निवडणुका न झाल्यास महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू होण्याची शक्यता आहे. २०१९ मध्येही निवडणुकीनंतर महाराष्ट्रात सरकार स्थापन होत नसल्याने राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती. गेल्या आठवड्यात झालेल्या निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेत निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी वेळ पडल्यास महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करण्याचे संकेतही दिले होते. कोणत्याही राज्यातील विधानसभेची मुदत संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत निवडणूक घेणे बंधनकारक असते. पण २६ नोव्हेंबर पूर्वी विधानसभेची निवडणूक न झाल्यास महाराष्ट्रात कायद्यानुसार राष्ट्रपती राजवट लागू होऊ शकते.

## रोहितदादांच्या मतदारसंघात जय पवारांची फिल्डींग!

जनतेच्या आणि त्या भागातील कार्यकर्ते यांच्या मागणीवर आहे. मी सात, आठ वेळा लढलो आहे. त्यामुळे मला त्यात इंटरेस्ट नाही. शेवटी पार्लमेंटरी बोर्ड ठरवेल की कोणाला उमेदवारी द्यायला पाहिजे, असं सूचक विधान अजित पवार यांनी केले. अजित पवार पुत्र जयसाठी बारामती सोडणार असतील तर ते कुठून लढणार याची चर्चा सुरु झाली. त्यावर अजितदादा विधानसभेला माझ्याविरोधात उमेदवार असू शकतात. लोकसभेला सुप्रियाताईसोबत जे झालं, तेच आता माझ्या बाबतीत घडू शकतं, असा कयास रोहित पवारांनी वर्तवला. त्यामुळे कर्जत-जामखेड, बारामती मतदारसंघांमधील घडामोडींकडे आता राज्याचे लक्ष लागले आहे.

अजित पवारांनी बारामती जयसाठी सोडल्यास ते स्वत: कर्जत-बारामतीमधून उभे राहण्याची शक्यता आहे. तसं झाल्यास काका विरुद्ध पुतण्या संघर्ष होईल. यातून पवारांचा राजकीय वारसदार कोण या प्रश्नाचाही निकाल लागेल. सुप्रिया सुळे राज्याच्या राजकारणात फारशा सक्रिय नसतात. त्यामुळे पवार कुटुंबाच्या राजकीय वारसा विचारात घेतल्यास अजित पवार, रोहित पवारांमध्येच स्पर्धा आहे. अजित पवारांनी बारामतीचा पर्याय निवडल्यास जय पवार कर्जत-जामखेडमधून लढू शकतात. तसे झाल्यासही पवार विरुद्ध पवार सामना होईल

## निवडणुका कितीही पुढे ढकलल्या तरी निकाल बदलणार नाही

वाटूनच निवडणुका जिंकता येतात, असे यांना वाटत असेल तर लोकसभेतही विजयी झाले असते. लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी देखील यांनी काही कमी उद्योग केले नाहीत, असा आरोप शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. राज्यात होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीची तयारी सर्वच राजकीय पक्षांनी सुरू केली आहे. त्यातच निवडणूक आयोगाच्या वतीने निवडणुकीच्या तारखा पुढे ढकलण्याचे संकेत देण्यात आले आहेत. त्यामुळे आता डिसेंबर अखेर निवडणुका होण्याची शक्यता आहे. या सर्व पार्श्वभूमीवर विरोधकांच्या वतीने राज्य सरकारवर टीका करण्यात येत आहे. केंद्रात आणि राज्यात युतीचे सरकार असताना देखील पराजयाच्या भीतीने निवडणुका पुढे ढकलण्यात येत असल्याचा आरोप विरोधी पक्षातील नेते करत आहेत. यातच सुप्रिया सुळे यांनी देखील राज्य सरकारवर निशाणा साधला आहे.




**वाचकांच्या लेखणीतून**

## तीन गावचा वतनदार

शेतकऱ्यांच्या जीवनात बैलाला फार महत्त्व होते. गोधन, बैलपोळा, नंदीबैल हे शब्द बैलाचे महत्त्व दर्शवितात. आता ट्रॅक्टर, धान्य मळणी यंत्रे, यांत्रिक नांगर यांसारख्या आधुनिक साधनांमुळे बैलाचे महत्त्व कमी होत गेले. किंबहुना बैल आता फक्त गाड्यांच्या शर्यती पुरतेच उरले आहेत की काय, अशी परिस्थिती आहे.



माझ्या बालपणी गुबुगुबू असा वाजल्याचा आवाज आला म्हणजे आमच्या मळ्यातील मुलांना भलताच आनंद होई. भल्या मोठ्या अंगावर रंगीबेरंगी झूल पांघरलेला, हिंगुळाच्या लाल रंगाने सजविलेल्या बाकदार शिंगाचा, गळ्यात खुळ्ळूम खुळ्ळूम वाजणाऱ्या घुंगुरमाळा घातलेला नंदीबैल पहायला आम्ही मुले गराडा घालीत असू. घराझोपड्यातल्या बायकाही पुढे सरसावून येत. नंदीबैलवाला फेटा आणि धोतर नेसलेला आणि ऐटबाज मिशा पिळीत सनई वाजवी. त्याची अस्तुरी गळ्यात अडकविलेले ढोलके गुबूगुबू वाजवीत असे. तसतसे नंदीबैलवाल्याला खेळ करायला स्फुरण चढत असे. आम्हा पोराठोरांची आणि आयाबायांचीही खेळ पहायची उत्सुकता चाळवली जायची.
तो घराझोपडीतल्या तरुण, म्हाताऱ्या गृहिणींना वयोमानाप्रमाणे ताई, आई, आजी, दानधरम करा. शंकराचा नंदी दारी आला आहे. अशी धार्मिक साद घालीत असे.

त्यावर जमा झालेल्या आयाबाया नंदीबैलवाल्याला विचारायच्या, आरं पर यंदा पाऊस पडंल का न्हाई?
मग नंदीबैलवाल्याची बाईल जोरात ढोलके बडवायची. गुबूगुबू गुबुगुबू.

ते ऐकून नंदीबैलवाला त्या नंदीच्या पाठीवर प्रेमाने थपथप वाजवीत त्याला प्रदक्षिणा घालायचा. त्यावर नंदीला प्रश्न टाकला जायचा, यंदा पाऊस पडंल का न्हाई, म्हाराजा?
नंदी होकारार्थी मान हलवायचा. ते पाहून आयाबाया आणि आम्ही मुलेही खूष व्हायचो! आयाबाया नंदीला हळदकुंकू लावायच्या.

आयाबाया सुपातून कुणी ज्वारी तर कुणी बाजरी त्या नंदीबैलवाल्याच्या झोळीत टाकीत. कारण सुपाएवढे काळीज करून (मोठ्या उदारपणे) दानधर्म केला जावा, असे आपली परंपरा सांगते.

पुन्हा ढोलके गुबुगुबू आणि सनई वाजायची. नंदीबैल वाला जालयला निघणार तोच नंदीबैलवाल्याला माझ्या आजीने हटकले, आरं शंकऱ्या, तुझा बाप यंदा आला नाय रं?
आजे, माझा बा वारला. आमच्या भावाभावांच्या वाटण्या झाल्या. दिभोयरं, निघूजं, वडनेर अशी तीन गावं माझ्या वाट्याला आली. मी मनात म्हटलं, हा तर तीन गावचा वतनदार! भलताच श्रीमंत म्हणायचा हा!!
नंदीबैलवाल्याची स्वारी सनईच्या आणि गुबुगुबूच्या सूरतालात ऐटीत पुढे निघून गेली!

■ नाना ढवळे
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.



# दुष्काळी पठार भाग विकासकामात प्रगतीपथावर

**■ सुजित झावरे पाटील यांचे प्रतिपादन**
**■ कान्हूर पठारला ५० लाखांच्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन**



**कान्हूर पठार : प्रतिनिधी**

**कान्हूर पठार हे भौगोलिक दृष्ट्या मोठं क्षेत्र असलेले गाव स्व. माजी आमदार वसंतदादा झावरे यांनी पठार भागाच्या विकासासाठी योगदान दिले आहे. गावातील अनेक कामे मार्गी लावण्यासाठी येथील ग्रामस्थ युवक तत्पर असतात. पठार भाग दुष्काळी असला तरी विकास कामांच्या माध्यमातून आज प्रगतीपथावर असल्याचे दिसून येते असे मत जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी व्यक्त केले.**

कान्हूर पठार येथे सुजित झावरे पाटील यांच्या प्रयत्नांतून मंजुर करण्यात आलेल्या नवलेवाडी पाण्याची टाकी तसेच गारगुंडी शिव रस्ता करणे ५०लाख रूपयांच्या विकास कामांचे भूमिपूजन सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी मा. सभापती अरुणराव ठाणगे, खरेदी विक्री संघ संचालक सतीश पिंपरकर, सरपंच विलास शेंडकर, मा. सरपंच बाळासाहेब रेपाळे, खरेदी विक्री संघ संचालक संग्राम पावडे, शहाजी कवडे, ज्येष्ठ नेते दत्तोबा ठाणगे, रविंद्र पाडळकर, मा. सरपंच गोकुळ वाळुंज, चंद्रकांत कुलकर्णी, दत्तात्रय ठुबे, सुभाष नवले, सहादू नवले, बाळासाहेब पानसरे, बन्सी ठुबे, शिवाजी नवले, दादाभाऊ नवले, विलास नवले, सुभाष ठूबे, बाळू नवले, प्रभाकर नवले, संभाजी नवले, सतिश नवले, श्रीपाद नवले, बाळू नवले, जालिंदर नवले, इंद्रभान नवले, गोकुळ शिंदे, अमोल नवले, योगेश ठूबे, ऋषी ठूबे, प्रकाश नवले, प्रदीप नवले, विलास लोंढे, नामदेव ठूबे, गणेश नवले, सचिन गाडगे, शिवाजी नवले, प्रकाश नवले, रंजन नवले, रवींद्र पारधी, अर्जुन नवले, विक्रम नवले, संपत नवले, मच्छिंद्र नवले, गणपत नवले, किसन ठुबे, आदेश नवले, वसंत नवले, अंकुश आवारी, राजू नवले, सर्जेराव नवले, मनोहर नवले, सुरेश नवले, सागर नवले, प्रदीप मते, ठेकेदार नरेंद पोळ व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सुजित पाटील शब्द पाळणारा नेता

सुजित पाटील हा शब्द पाळणारा नेता आहे. अनेक विकासकामे त्यांनी तालुक्यात मार्गी लावली आहेत. कान्हूर पठार येथील रस्त्याचा प्रश्न घेऊन आम्ही त्यांच्या ऑफिसला गेलो त्यांनी तात्काळ रस्त्याला मंजुरी मिळवून दिली व आज कामही सुरू होत आहे. यामध्येच खरा आम्हा ग्रामस्थांना आनंद आहे. सुजित झावरे पाटील हे विकास कामे करणारे तालुक्यातील एकमेव नेतृत्व आहे.

**दत्तात्रय ठुबे,** कान्हूर पठार

# पारनेर तालुका मेडिकल असोसिएशनचा पोलीस ठाण्यावर मूक मोर्चा

**■ कोलकत्ता घटनेचा निषेध ■ पोलीस निरिक्षकांना निवेदन**

**पारनेर : प्रतिनिधी**

**९ ऑगस्ट २०२४ रोजी कोलकत्ता येथील आर जी कर वैद्यकीय महाविद्यालयात घडलेली घटना निंदनीय व निषेधार्थ असुन शनिवारी पारनेर तालुका मेडिकल असोसिएशनच्या वतीने पोलीस ठाण्यावर मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.तर या घटनेचा निषेधासाठी २४ तासांसाठी वैद्यकीय सेवाही बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता.**



यासंबंधीचे निवेदन संघटनेच्या वतीने डॉ. नुतन रोहोकले व डॉ.पद्मजा पठारे ,डॉ. स्वाती खिलारी यांनी पोलिस निरीक्षक समीर बारवकरांना दिले.पारनेर तालुका मेडिकल असोसिएशनने शनिवारी १७ ऑगस्ट रोजी दुपारी हॉटेल ऋषिकेश ते तहसील कार्यालया पर्यंत मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.पारनेर तालुका मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. भाऊसाहेब खिलारी, उपाध्यक्ष डॉ .सोमेश्वर आढाव, खजिनदार डॉ.जितेंद्र खामकर, सचिव डॉ. संदीप तांबे, डॉ.शोभा गायके,डॉ.नीता अडसूळ, औटी डॉ.उज्वला नरोडे,डॉ.धनश्री गायकवाड,डॉ. सुवर्णा लोळगे, डॉ. ज्योती पितळे, डॉ पूर्णिमा पुरकर, डॉ.संदीप औटी,डॉ.अजित लंके, डॉ. पांडुरंग थोरात, डॉ.सुनील कदम,डॉ.अशोक सरोदे, डॉ.श्रीमंदिलकर, लोळगे डॉ. श्रीकांत पठारे, डॉ. विजय पुरी, डॉ.जयवंत निमसे, डॉ.वैभव झावरे ,डॉक्टर सौ. झावरे डॉ. दिपाली दाते डॉ संजीवनी नवले यांच्यासह संघटनेचे चारही झोनचे वैद्यकीय बांधव मोठ्या संख्येने हजर होते.

या मुकमोर्चात पारनेर तालुक्यातील विजयगंगा नर्सिंग स्कूल व सावली स्कूल ऑफ नर्सिंग इंदिरा गांधी स्कूल ऑफ नर्सिंगच्या विद्यार्थिनी व त्यांचे शिक्षक आणि विविध हॉस्पिटलचे महिला कर्मचारी उपस्थित होत्या.

या निवेदनात म्हटले आहे की ९ ऑगस्ट २०२४ रोजी कोलकत्ता येथील आर जी कर वैद्यकीय महाविद्यालयात घडलेल्या अत्यंत निंदनीय घटनेमुळे आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या हलगर्जीमुळे संपूर्ण वैद्यकीय क्षेत्राला मोठा धक्का बसला आहे. या घटनेत एका तरुणी डॉक्टरवर क्रूरपणे बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली. त्यानंतरच्या काळात या प्रकरणातील अधिकाऱ्यांनी निष्काळजी. पणे वागणूक दिली आणि तपासातही निष्काळजी पणा दाखविला. तसेच स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट रोजी आंदोलक विद्यार्थ्यांवर हल्ला करण्यात आला आणि रुग्णालयातील विविध विभागांची तोडफोड करून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला.त्यामुळे या घटनेचा निषेध करण्यासाठी बंद पुकारला असून बंदमध्ये सर्व अत्यावश्यक सेवा सुरू राहतील, परंतु नियमित ओपीडी आणि तातडीच्या नसलेल्या शस्त्रक्रियाही केल्या जाणार नाहीत. या माध्यमातून आम्ही वैद्यकीय व्यावसायिकांच्या सुरक्षेसाठी न्याय्य मागण्यांची पूर्तता करण्याचा प्रयत्न करीत आहोत.या बंदला पारनेर तालुका मेडिकल असोसिएशन आणि केमिस्ट संघटना आणि लॅब संघटना पारनेर यांचा पाठिंबा असून २४ तास वैद्यकीय सेवा बंद आंदोलन करण्यात आल्या आहे.

# सिंधुताई विखेंनी भरले महिलांच्या पंखात बळ !



**अळकुटी : प्रतिनिधी**

**भारत राष्ट्राच्या उभारणीत महिलांचे मोठे योगदान आहे. अहमदनगर जिल्ह्यात सिंधूताई विखेंच्या माध्यमातून महिलांच्या विकासाचे भरीव कार्य झाले.त्यांच्या माध्यमातून महिलांच्या पंखात बळ भरल्याचे प्रतिपादन वरिष्ठ लेखापाल सूर्यमाला भोर यांनी केले.**

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी येथे सिंधूताई विखे पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी बोलताना सूर्यमाला भोर यांनी सिंधुताईच्या कार्यास उजाळा दिला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शरद पारखे अध्यक्षस्थानी होते.

पुढे बोलताना भोर म्हणाल्या की ,सिंधूताईनी महिला मंडळाच्या माध्यमातून प्रियदर्शनी सार्वजनिक वाचनालय आणि महिलांसाठी पहिली सहकारी पतसंस्था सुरू केली. याच संस्थेच्या माध्यमातून महिलांच्या शिक्षणासाठी त्यांनी पुणतांबा येथे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सुरू केले. लोणी येथे प्रियदर्शनी ग्रामीण अध्यापक महाविद्यालय सुरू करून ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाला दिशा दिली. महिलांसाठी शिवणकला प्रशिक्षण, लघुउद्योग केंद्र, अद्वैत महिला भजनी मंडळाच्या माध्यमातून त्यांनी महिलांचे संघटन उभे केले.

महिला बचत गट मेळावे, माता बालसंगोपन शिबिर अशा सामाजिक उपक्रमातून श्रीमती सिंधुताई विखे पाटील यांनी महिलांना सामाजिक कार्यात सक्रियतेने सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यांच्या याच कार्याचा गौरव म्हणून राज्य सरकारचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार, मातोश्री रमाबाई आंबेडकर आदर्श महिला पुरस्कार, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार तसेच पुणे विद्यापीठाच्या जीवनगौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. म्हणूनच सिंधुताईनी महिलांच्या पंखात बळ भरले असे म्हणता येईल असेही भोर म्हणाल्या.

यावेळी उपप्राचार्य प्रा. अर्जुन चाटे, प्रा. विशाल रोकडे, सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. स्वाती फापाळे यांनी केले. तर प्रास्ताविक व आभार प्रा. सुनिता जाधव यांनी केले.

# पारनेरात मंगळवारी धडाडणार सुषमा अंधारेंची तोफ!

**■ शिवसेना ठाकरे गटाचा महाराष्ट्र अस्मिता मेळावा**
**■ प्रवक्ता संजना घाडी यांचीही उपस्थिती**

**पारनेर : प्रतिनिधी**



**शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आगामी विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने जोरदार तयारी सुरु केली असून पारनेर तालुक्यात महाराष्ट्र अस्मिता मेळाव्याच्या निमित्ताने मोठं शक्तिप्रदर्शन करत शिवसेनेच्या फायरब्रँड नेत्या सुषमा अंधारे व शिवसेना प्रवक्त्या संजना घाडी यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी शिवसैनिकांचा भव्य मेळावा पार पडणार असल्याची माहिती तालुकाप्रमुख डॉ.श्रीकांत पठारे यांनी दिली आहे.**

या मेळाव्याची तयारी पुर्ण झाली असून पारनेरच्या तहसीलदार कार्यालयाजवळील पानोली चौकातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात मंगळवार दि. २० ऑगस्ट रोजी सकाळी ११:३० वाजता मेळावा होणार आहे.यावेळी जिल्हाप्रमुख प्रा.शशिकांत गाडे, युवासेना जिल्हाप्रमुख रवी वाकळे, महिलाआघाडी जिल्हाप्रमुख आशाताई निंबाळकर, उपजिल्हाप्रमुख संदेश कार्ले तसेच तालुक्यातील सर्व आघाड्यांचे पदाधिकारी, शिवसैनिक व नागरिक मोठ्या संखेने उपस्थित राहणार असल्याचे डॉ.पठारे यांनी सांगितले.

पारनेर तालुका हा शिवसेनेचा बालेकिल्ला असून शिवसैनिकांनी डॉ. श्रीकांत पठारे यांच्या नेतृत्वाखाली लोकसभेला महाविकासआघाडीच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. त्यामुळे आता शिवसेनेला पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाची जागा मिळावी यासाठी शिवसैनिक कामाला लागले असून त्यादृष्टीने गेल्या काही दिवसांत संपूर्ण तालुका डॉ.पठारे यांच्या नेतृत्त्वाखाली काढलेल्या मशाल यात्रेच्या माध्यमातुन शिवसैनिकांनी तालुका पिंजून काढला आहे. मशाल यात्रेला मिळालेल्या उस्फुर्त प्रतिसादाने शिवसैनिक मोठ्या जोमाने गावागावात विधानसभा निवडणुकीची जय्यत तयारी करत आहेत व याचाच भाग म्हणून महाराष्ट्र अस्मिता मेळावा पारनेरला भव्यदिव्य प्रकारे होणार असल्याची माहिती महिला आघाडी तालुकाप्रमुख प्रियंका खिलारी यांनी दिली आहे.

# पारनेरचा गुणवंतांचा तालुका म्हणून राज्यात लौकिक

**चेअरमन चंद्रकांत लंके यांचे गौरोद्गार**



**निघोज : प्रतिनिधी**

**पारनेर तालुका हा गुणवंतांचा तालुका म्हणून राज्यात नावलौकिक असून गेली पंधरा ते वीस वर्षात स्पर्धा परीक्षा माध्यमातून केंद्र व राज्य सरकारच्या सेवेत अधिकारी म्हणून आजपर्यंत शेकडो युवकांना संधी मिळाली असून वडगाव गुंड - शिरसुले परिसराचे भूषण शांताराम रामचंद्र घोगरे यांना मंत्रालयात कक्ष अधिकारी होण्याची संधी मिळाली ही निघोजकरांसाठी अभिमानास्पद बाब असल्याचे प्रतिपादन श्री पांडुरंग कृपा सहकारी पतसंस्थेचे चेअरमन चंद्रकांत लंके यांनी व्यक्त केले आहे.**

शिरसुले येथील शांताराम घोगरे यांची नुकतीच मुंबईत मंत्रालयात कक्ष अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा श्री पांडुरंग कृपा सहकारी पतसंस्था, शिरसुले - वडगाव गुंड व निघोज ग्रामस्थ यांच्या वतीने चेअरमन चंद्रकांत लंके, व्हा.चेअरमन दत्तात्रय गुंड, ज्येष्ठ संचालक भागुजी गुंड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे संचालक व तनपुरे वस्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बन्सी गुंड, विजय गुंड, चिंतामण गुंड, व्यवस्थापक संतोष बनकर व ग्रामस्थ उपस्थित होते.

सांगितले की जिल्हा परिषद, माध्यमिक विद्यालय, उच्च महाविद्यालय ही शिक्षणाची केंद्र शैक्षणिक संस्कृतीने बहरुन गेली आहेत. गुरुजनांचे मार्गदर्शन आई वडील नातेवाईक मित्र परिवार आप्तेष्ट मंडळी व ग्रामस्थ यांचे पाठबळ यामुळे हे यश आपण संपादन केले असून ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचा तालुका म्हणून पारनेरचा नावलौकिक जगात आहे. निस्वार्थपणे जनसेवा करीत आपण सेवाभाव करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

पतसंस्थेचे व्यवस्थापक संतोष बनकर यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. पतसंस्थेचे व्हा.चेअरमन दत्तात्रय गुंड यांनी आभार मानले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न देण्याची मागणी

**निघोजला जयंती उत्साहात साजरी**

**निघोज : प्रतिनिधी**

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जनतेसाठी मोठ्या प्रमाणात योगदान असून या त्यागी महात्म्यामुळे जनता साहित्यातून संघटीत झाली असून भारत सरकारने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न देण्याची मागणी प्रसिद्ध व्याख्याते प्रविण लोखंडे महाराज यांनी केली आहे.**



निघोज येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी ते बोलत होते. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती कमिटी व निघोज ग्रामस्थ यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याची गावातून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली होती.यावेळी समाजबांधव, अल्पसंख्याक समाज, ग्रामस्थ व महिला भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

फटाक्यांची आतषबाजी, विद्युत रोषणाई व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, बाळ गंगाधर टिळक या महामानवांच्या जयजयकारांच्या घोषनांनी निघोज परिसर निनादून गेला होता. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृहात जयंती कार्यक्रम निमित्ताने जाहीर सभा घेण्यात आली.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या राणीताई लंके, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील, माजी सरपंच ठकाराम लंके, दुष्काळ निवारण समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लंके, माजी उपसरपंच उमेश सोनवणे, ग्रामपंचायत सदस्य भावना साळवे, प्रियंका गंधाक्ते, आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण, विलास हारदे, ठकाराम गायखे, जी एस महानगर बँकेचे वरिष्ठ अधिकारी लक्ष्मणराव साळवे, मुंबई येथील सामाजिक कार्यकर्त्या भाग्यश्री साळवे, जयंती कमिटीचे प्रमुख पदाधिकारी मोहन साळवे, सतीश साळवे, शशी साळवे, कचरदास साळवे, भिमा साळवे, बाबाजी साळवे, बाळासाहेब साळवे, अर्जुन वैरागर, रवि रणसिंग आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या राणीताई लंके, व्याख्याते प्रविण लोखंडे महाराज, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांच्या हस्ते व्यासपीठावरील सर्व महामानवाच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद सदस्या राणीताई लंके, तसेच व्यासपीठावर असलेल्या सर्वच मान्यवरांची भाषणे झाली. सायंकाळी वाजत गाजत मिरवणूक, रात्री जाहीर सभा व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन अशाप्रकारे झालेल्या हा कार्यक्रम जवळपास सहा तास सुरू होता. यासाठी मोठ्या प्रमाणात मुंबई पुणे, अहिल्यानगर, जुन्नर, शिरूर परिसरातील पाहुणे मंडळी तसेच त्याठिकाणी असलेले पारनेर तालुक्यातील स्थायिक जनता मोठ्या संख्येने या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सामाजिक कार्यकर्ते जयंती कमिटीचे प्रमुख पदाधिकारी मोहन साळवे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले शेवटी जी एस महानगर बँकेचे वरिष्ठ अधिकारी लक्ष्मणराव साळवे यांनी आभार मानले. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे लोकवंदना गित गात कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# सरपंच बंटी साबळे यांच्याकडून रांजणगावला रुग्णवाहिकेची भेट

**■ स्वातंत्र्य दिनाचे औचित्य ■ परिसरातील रुग्णांची होणार सोय**

**रांजणगाव मशिद : प्रतिनिधी**

**स्वातंत्र्य दिनानिमित्त रांजणगाव रस्ता येथे सरपंच बंटी साबळे यांनी रुग्णवाहिका आणि त्याचबरोबर मुंबई महानगरपालिकेच्या अधिकारी सुदर्शन जवक यांच्यातर्फे शहीद जवान अंकुशराव जवक यांच्या स्मरणार्थ शाळेतील विद्यार्थ्यांसाठी खाऊचे वाटप करण्यात आले.**



रांजणगाव मध्ये उक्कलगाव, चांभुर्डी ,अस्तगाव,पिंप्री गवळी असे शेजारील गावातील बरेचसे पेशंट डॉक्टर वाघ आणि डॉक्टर येणारे त्यांच्याकडे येत असतात पण सिरीयस पेशंटला नगरकडे पाठवण्यासाठी रुग्णवाहिकेची व्यवस्था नव्हती.आत्ताच राजीनामा दिलेले रांजणगावचे माजी सरपंच बंटी साबळे यांना दवाखान्यातून फोन गेला की गावातील एक पेशंट खूप आजारी आहे आणि त्यांना उपचारासाठी नगरला हलवायचं हे ऐकताच बंटी साबळे यांनी आपली स्वतःची गाडी पाठवली होती याचा संदर्भ लक्षात घेऊन आणि गावाची गरज लक्षात घेऊन माजी सरपंच बंटी साबळे यांनी रांजणगाव साठी आणि राहुलदादा शिंदे पाटील मित्र मंडळासाठी ॲम्बुलन्स गाडी स्वखर्चातून भेट केली आहे. यासाठी लागणारा डिझेलचा खर्च वर्गणीतून गोळा झाला आहे आणि हे रात्र दिवस कधीही पेशंटची गरज लक्षात घेता लगेच उपलब्ध करण्यात येत आहे. याचे रांजणगाव परिसरात अभिनंदन करण्यात येत आहे.

यामुळे रांजणगाव परिसरातील अनेक अत्यावस्थ पेशंटला जीवदान मिळणार आहे.

यावेळी गावातील प्रियंकाताई राहुल शिंदे पाटील माजी सरपंच बंटी साबळे, सरपंच काका देशमुख, उपसरपंच बाबा जवक, माजी सरपंच शरद सरोदे, डॉक्टर येणारे, डॉक्टर वाघ, नानासाहेब ईकडे, दत्तात्रय लोणकर, नवी मुंबईचे महानगरपालिका अधिकारी सुदर्शन जवक, दिलीप गाढवे, शाळेतील शिक्षक वर्ग, संतोष सरोदे, भाऊ देशमुख, सोमनाथ बनकर, शिंदे, वैभव जवक, अनिल जवक, सुदाम जवक, उपसरपंच शिवाजी शिंदे नंदू शिंदे, विक्रम गाढवे, मोहन शेठ लोणकर, आप्पा गवळी, आप्पासाहेब देशमुख, आणि गावातील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात हजर होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com